महाराष्ट्र पोलीस

जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-
cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. 9819208279

**प्रेसनोट** दिनांक ३०.१२.२०२४

ठाणे पोलीस आयुक्तालय परिसरात दिनांक ३१ डिसेंबर २०२४ रोजी सरत्या वर्षाला निरोप देण्याकरीता व दिनांक १ जानेवारी २०२५ नववर्षाचे स्वागत उत्सवाच्या अनुषंगाने विविध ठिकाणी सर्व जाती/धर्मांचे लोक एकत्र जमा होत असतात. सदर वेळी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत ठाणे, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर व वागळे या परिमंडळातील महत्वाच्या रहदारीच्या/गर्दीच्या ठिकाणी, रस्त्यांवर ठिकठिकाणी नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले आहे.

३१ डिसेंबर २०२४ अनुषंगाने ठाणे पोलीस आयुक्तालयात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून पोलीस बंदोबस्त करिता ०२ अपर पोलीस आयुक्त, ०८ पोलीस उप आयुक्त, १६ सहाय्यक पोलीस आयुक्त, ११८ पोलीस निरीक्षक, ३१५ सपोनि/ पोउपनि, २२५३ पोलीस अंमलदार, ३७८ महिला पोलीस अंमलदार, ०१ एसआरपीएफ कंपन्या, ०३ आरसीपी प्लाटून असा बंदोबस्त तैनात ठेवण्यात आलेला आहे. तसेच ठाणे शहर वाहतूक विभाग व स्थानिक पोलीस स्टेशन यांनी संयुक्तपणे ठाणे आयुक्तालय परिसरात ५६ ठिकाणी नाकाबंदी पॉईट लावण्यात आलेले असून त्यासोबत ब्रेथ एनालायझरच्या ४१ उपकरणे उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत. या व्यतीरिक्त मोठया प्रमाणावर राखीव बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे.

तसेच ३१ डिसेंबर २०२४ च्या अनुषंगाने पोलीस आयुक्तालय परिसरात दि.२९.१२.२०२४ रोजी **ऑल आउट** ऑपरेशन राबविण्यात आले असून त्या दरम्यान विविध कायदयांतर्गत महाराष्ट्र पोलीस कायदा, भारतीय न्याय संहिता, अंमली पदार्थ विरोधी कायदा, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता तसेच मोटार वाहन कायदा इ. प्रमाणे कारवाई करण्यात आलेल्या आहेत. तसेच पाहिजे आरोपी, फरारी आरोपी, गुंड, हद्दपार (तडीपार), हिस्ट्रीशिटर यांचा कसुन शोध घेण्यात येऊन त्यांच्यावर योग्य ती प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून सदर ऑल आउट ऑपरेशन कारवाई दरम्यान **एकुण ७,२८,१५०/- रू.** दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच सदर ऑल आउट ऑपरेशन दि. ३०.१२.२०२४ व दि. ३१.१२.२०२४ रोजी देखील राबविण्यात येणार आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत महत्त्वाच्या व गर्दीच्या ठिकाणी हॉटेल्स, लॉजेस, ढाबे, लॉन्स, गुन्हेगार लपण्याची ठिकाणे या परिसरात गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गस्ती करिता नेमण्यात आले असून आस्थापनामध्ये येणाऱ्या-जाणाऱ्या संशयित व्यक्तींवर नजर ठेवण्याबाबतचे आदेश संबंधित पोलीस अधिकारी/अंमलदार यांना देण्यात आलेले आहेत. तसेच सदरची ठिकाणे सी.सी.टी.व्ही. निगराणीखाली राहतील, याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात आलेली आहे.

सदर उत्सवाकरिता एकत्रीत येणाऱ्या गर्दीच्या ठिकाणी, बस स्थानके, रेल्वे स्टेशन, बाजारपेठा, मोठया प्रमाणात साजरे होणारे कार्यक्रमांची ठिकाणे, खाडी किनारी, जेट्टी लॅन्डीग पॉईन्ट अशा ठिकाणी विशेष शाखेतील नागरी गणवेशातील महिला व पुरुष अधिकारी/अंमलदार यांची निगराणी करिता नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच महिला छेडछाडीचे प्रकार टाळण्यासाठी प्रत्येक परिमंडळ हद्दीत निर्भया पथके गस्ती करिता नेमण्यात आलेली आहेत.

सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्या हूल्लडबाजांवर नजर ठेवण्याकरिता व कारवाई करीता भरारी पथके तयार करण्यात आली आहेत.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ ते ५ व वाहतुक नियंत्रण शाखा यांनी उत्सवा दरम्यान मद्यसेवन करून वाहने चालविणाऱ्या वाहन चालकांविरुध्द ब्रेथ अनालायझरचा वापर करून कडक कायदेशीर कारवाई करण्याच्या सुचना संबधित विभागास दिल्या असून त्या अनुषंगाने नागरीकांना जाहीर आव्हान करण्यात येते की, कोणीही मद्यपान सेवन करून वाहने चालवू नयेत. तसेच उत्सवादरम्यान फटाक्यांची आतिषबाजी करताना ध्वनी व वायु प्रदूषणाबाबत योग्य ती खबरदारी घेऊन मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच नववर्ष स्वागता दरम्यान काही संशयित हालचाली व संशयित वस्तु दिसून आल्यास तात्काळ स्थानिक पोलीसांशी अथवा मुख्य नियंत्रण कक्ष, ठाणे शहर येथे क्रमांक ११२ वर संपर्क साधावा.

सर्व नागरीकांनी नववर्षाचे स्वागत उत्साहात व शांततेत करावे असे आवाहन **मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर** यांनी केले आहे.

**सर्व नागरीकांना ठाणे शहर पोलीस दलातर्फे खूप खूप शुभेच्छा!**

(मीना मकवाणा)
पोलीस उप आयुक्त,
विशेष शाखा, ठाणे